# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.08.2025** **वारःबुधवार**

---

1. सेमीकंडक्टर क्षेत्रात भारत वेगानं प्रगती करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. परराष्ट्र मंत्रालयाकडून परदेशस्थ भारतीय नागरिकत्व अर्थात ओसीआयबाबतच्या नियमांमध्ये सुधारणा
3. राजस्थानमध्ये दौसा जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या अपघातात 10 जणांचा मृत्यू आणि
4. जागतिक वुशु स्पर्धेत रौप्य पदक मिळवून भारताच्या नम्रता बत्राची ऐतिहासिक कामगिरी

**सेमीकंडक्टर**

सेमीकंडक्टर क्षेत्रात देश वेगाने प्रगती करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. देशाच्या डिजिटल भविष्याला बळ देण्यासाठी याद्वारे एक गतीमान परिसंस्था उभारली जात असून जागतिक नवोन्मेषालाही चालना मिळत आहे असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात नमूद केलं. काल केंद्रिय मंत्रीमंडळानं ओडिशा, पंजाब आणि आंध्र प्रदेशातल्या चार नव्या सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्पांना मंजूरी दिली. या निर्णयामुळे उत्पादन क्षमता वाढेल, उच्च कौशल्याची आवश्यकता असलेले रोजगार निर्माण होतील शिवाय जागतिक पुरवठा साखळीत भारताला प्रमुख स्थान मिळेल असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला आहे. उत्तर प्रदेशातल्या लखनऊ इथला मेट्रो रेल्वे प्रकल्प, अरुणाचल प्रदेशातला जलविद्युत प्रकल्प यांनाही मंत्रीमंडळानं मंजूरी दिल्याची माहिती, केंद्रिय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

**परराष्ट्र मंत्रालय-ओसीआय**

परराष्ट्र मंत्रालयानं परदेशस्थ भारतीय नागरिकत्व अर्थात ओसीआयबाबतचे नियमांमध्ये काही सुधारणा केल्या आहेत. एखाद्या ओसीआय नागरिकाला दोन वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा झाली असेल किंवा सात वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवासाच्या शिक्षेसाठी आरोपपत्र दाखल झालं असेल तर त्या व्यक्तीचं परदेशस्थ नागरिकत्व रद्द केलं जाईल असं मंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्या काही वर्षांमधे ओसीआय कार्ड असलेल्या नागरिकांचा गुन्ह्यांमध्ये अथवा देशविरोधी कारवायांमध्ये सहभाग असल्याचं आढळून आल्यानंतर परराष्ट्र मंत्रालयानं नियमांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

**शेतकरी-केंद्र सरकार**

व्यापार करारांबाबतच्या इतर देशांच्या दबावाला बळी न पडता शेतकऱ्यांच्या हितासाठी धाडसी निर्णय घेतल्याबद्दल देशभरातल्या शेतकऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. शेतकरी संघटनांचे नेते आणि शेतकरी यांनी काल केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांची भेट घेऊन आभार व्यक्त केले. बनावट खतं आणि रसायनं उत्पादन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी नवे कायदे करणार असल्याचा पुनरुच्चार चौहान यांनी यावेळी केला. शेतकरी केवळ भारताचेच नाही तर जगाचे अन्नदाते आहेत. त्यांची सेवा म्हणजेच ईश्वराची सेवा असं चौहान म्हणाले.

**भारत-सिंगापूर**

भारत सिंगापूर यांच्यातली तिसरी मंत्रीस्तरीय गोलमेज परिषद आज नवी दिल्लीत होणार आहे. केंद्रिय मंत्री डॉ. एस. जयशंकर, निर्मला सीतारामन, अश्विनी वैष्णव आणि पीयूष गोयल यामध्ये सहभागी होतील. सिंगापूरचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री बैठकीला उपस्थित राहणार असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे. भारत आणि सिंगापूर यांच्यातल्या सहकार्याला नवी दिशा देण्याचं या गोलमेज परिषदांचं उद्दीष्ट असल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

**निवडणूक आयोग**

निवडणूक आयोगानं काल नवी दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळासोबत चर्चा केली. गेले काही महिने निवडणूक आयोग विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरच्या राजकीय पक्षांच्या प्रमुखांसोबत चर्चा करत आहे. आतापर्यंत आयोगानं 4 हजार 719 सर्वपक्षीय बैठका घेतल्या आहेत. यामध्ये राज्य, जिल्हा स्तरावरील निवडणूक अधिकाऱ्यांसह मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी विविध पक्षांच्या 27 हजारांपेक्षा जास्त प्रतिनिधींसोबत संवाद साधला.

**बांग्लादेश-निर्बंध**

तागापासून निर्मित काही उत्पादनं आणि दोर यांची बांग्लादेशातून रस्ते वाहतुकीद्वारे आयात करण्यावर भारतानं बंदी घातली आहे. ही बंदी तत्काळ प्रभावानं लागू असेल. या वस्तूंची आयात केवळ महाराष्ट्रातल्या न्हावाशेवा बंदरातूनच करता येईल. भारत बांग्लादेश सीमेवरील कोणत्याही बंदरातून आयातीला परवानगी दिली जाणार नाही, असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**मेक्सिको-युएस**

सीमेपलीकडून अमली पदार्थ पाठवणाऱ्या गुन्हेगारांवरील कारवाईत मेक्सिकोनं 26 उच्च पदस्थ व्यक्तींना अमेरिकेत हद्दपार केलं आहे. अमेरिकेच्या ताब्यात देण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये लॉस कुइनिस चा नेता अबीगेल गोन्झालेस व्हॅलेन्सिया याचा समावेश आहे. सीमेपलीकडून होणारी अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी ट्रम्प प्रशासनाकडून दबाव आल्यानंतर मेक्सिकोनं ही कारवाई केली. अमली पदार्थांची तस्करी, खून, आणि इतर गुन्ह्यांमध्ये आरोपी असलेल्या व्यक्तींना हद्दपार करण्याची ही दुसरी वेळ आहे.

**मुंबई उच्च न्यायालय ओळखपत्र**

केवळ आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा मतदार ओळखपत्र यासारखी कागदपत्रं असल्यामुळे एखादी व्यक्ती भारतीय नागरिक होऊ शकत नाही असं मुंबई उच्च न्यायालयानं म्हटलं आहे. भारतात बेकायदेशीररित्या प्रवेश करुन, गैरमार्गांचा वापर करुन ही ओळखपत्रं मिळवलेल्या कथित बांग्लादेशी नागरिकाचा जामीन अर्ज फेटाळताना न्यायालयानं हे निरीक्षण नोंदवलं. ही ओळखपत्र केवळ ओळख पुरावा म्हणून वापरण्यासाठी किंवा सेवांचा लाभ घेण्यासाठी आहेत. मात्र नागरिकत्व कायदा 1955 मधल्या तरतूदींनुसार नागरिकत्वासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांचा पर्याय नाहीत असं न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठानं सांगितलं.

**स्वातंत्र्य दिन लष्कर**

देशाच्या 79 व्या स्वातंत्र्यदिनाचं औचित्य साधून, तीनही सशस्त्र दलांनी तसंच तटरक्षक दल, केंद्रिय सशस्त्र पोलिस दल आणि राष्ट्रीय छात्र सेनेनं देशभरात 142 ठिकाणी विशेष वाद्यवृंद सादरीकरणाचं आयोजन केलं आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या गौरवार्थ तसंच देशवासियांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करण्यसाठी आणि ऑपरेशन सिंदूरचं यश साजरं

करण्यासाठी 15 ऑगस्टला संध्याकाळी हे सादरीकरण केलं जाणार आहे. पुण्यात शनिवारवाडा आणि गांधी राष्ट्रीय संग्रहालयाच्या परिसरात तसंच मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनस, गेटवे ऑफ इंडिया, फ्लोरा फाउंटन आणि नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर लोकांना हे सादरीकरण पाहता येईल.

**<u>अपघात</u>**

राजस्थानमध्ये दौसा जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या अपघातात 10 जणांचा मृत्यू झाला असून 11 जण जखमी झाले आहेत. दौसा मनोहरपूर महामार्गावर पिकअप वाहन आणि ट्रक यांची धडक होऊन हा अपघात घडला. मृतांमधे उत्तर प्रदेशातल्या 7 मुलांसह तीन महिलांचा समावेश असून ते खाटू श्याम मंदिराच्या यात्रेनंतर परत निघाले होते.

**<u>पारंपरिकखेळ</u>**

महाराष्ट्रात मुंबई इथं आजपासून खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभ स्पर्धा सुरू होत आहे. भारतीय पारंपरिक खेळांच्या या स्पर्धेत 15 हजारांपेक्षा जास्त लोकांनी सहभाग नोंदवला आहे. राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल स्पर्धेच्या तयारीची पाहणी केल्यानंतर ही माहिती दिली. लेझीम, फुगडी, लगोरी, विट्टी दांडू यासह छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील साहसी क्रीडा प्रकारांचा यात समावेश आहे. तसंच कबड्डी, खो खो, मल्लखांब, पावनखिंड स्प्रिंट, कुस्ती, दोरी उडी आणि योग यांच्या पुरुष आणि महिला गटातल्या स्पर्धा होतील.

**<u>सुब्रतो कप</u>**

64 वी सुब्रतो करंडक आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धा येत्या 19 ऑगस्टपासून सुरू होणार. यामध्ये मुलं आणि मुली, ज्युनिअर आणि सबज्युनिअर अशा 3 श्रेणींमध्ये 106 संघ सहभागी होणार आहेत. 19 ऑगस्ट ते 25 सप्टेंबर दरम्यान दिल्ली एनसीआर आणि बंगळूरू मध्ये या स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत. हे स्पर्धक देशातील विविध शैक्षणिक संस्थांचं प्रतिनिधित्व करणार आहेत. यामध्ये 4 परदेशी संघही सहभागी होणार आहेत. काल दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ही घोषणा करण्यात आली.

**<u>वुशूस्पर्धा</u>**

चीनमधील चेंगडू इथं झालेल्या जागतिक स्पर्धेत वुशू मध्ये भारतासाठी पहिलं पदक जिंकून नम्रता बत्रा हिनं इतिहास रचला आहे. फिलिपिन्सच्या क्रीझान फेथ कोलाडोवर दमदार विजय मिळवत नम्रतानं अंतिम फेरीत प्रवेश करुन पदक निश्चित केलं. मात्र मेंगुई चेन बरोबर सुवर्णपदकासाठी झालेला सामना नम्रताला 0-2 असा गमवावा लागला. त्यामुळे तिला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.